KOLHAPUR

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित

# विवेकानंद कॉलेज, (स्वायत्त) कोल्हापूर,

## समाजशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष 2021 - 22

दि. 17/05/2022

## नोटीस

समाजशास्त्र विभागातील बी. ए. भाग 2 च्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष 2021 - 22 च्या दुसऱ्या सत्राच्या अंतर्गत मूल्यमापनासाठी आवश्यक असणारे होम असाइनमेंट दिनांक 31/05/2022 पर्यंत समाजशास्त्र विभागात जमा करावेत.

एच. व्ही. चामे

**HEAD**
**DEPARTMENT OF SOCIOLOGY**
**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR**
**(AUTONOMOUS)**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Student Marks Entry

Course: B.A. - SY

Session:JUNE-JULY 2022

Subject: SOCIOLOGY PAPER-V (DSC-1021D1) - CIE

| Sr. No. | PRN No | Seat No | Student Name | Marks |
|---|---|---|---|---|
| 1 | 2020014505 | 410004 | BAGADI ASHWINI RAMDAS | 9 |
| 2 | 2020014506 | 410005 | BAGADI SAISHWAR RAJU | 9 |
| 3 | 2020014515 | 410013 | BHOSALE CHANDRAKANT DNYANOBA | 9 |
| 4 | 2020014530 | 410021 | CHAUGALE SATYJEET PRAKASH | 9 |
| 5 | | 410025 | CHAVAN SAMRUDHI NANDAKUMAR | 10 |
| 6 | 2020014543 | 410030 | CHOUDHARI TEJASWINI SUBHASH | 9 |
| 7 | 2020014545 | 410032 | CHOUGALE TEJASHRI MADHUKAR | 10 |
| 8 | 2020014550 | 410035 | DALAVI SNEHAL NAMDEV | 10 |
| 9 | 2020014551 | 410036 | DALVI PRANAV PRADIP | 9 |
| 10 | 2020014562 | 410043 | GHATAGE VISHWAJEET MADHAVRAO | 10 |
| 11 | 2020014789 | 410057 | HULASWAR AVDHOOT PRAKASH | 9 |
| 12 | 2020014587 | 410063 | JAGADALE SOURABH SAMPAT | 9 |
| 13 | 2020014589 | 410064 | JAGTAP ASHA NIWRUTTI | 10 |
| 14 | 2020014595 | 410069 | JATHAR SANKET SHAHAJI | 9 |
| 15 | 2020014596 | 410071 | KADAM ABHISHEK SUDESH | 9 |
| 16 | 2020014601 | 410075 | KALOKHE PRANIL ANIL | 9 |
| 17 | 2020014602 | 410076 | KAMBLE ADITYA KRISHNAT | 9 |
| 18 | 2020014609 | 410081 | KAMBLE HARSHAD AAKARAM | AB |
| 19 | 2020014612 | 410086 | KAMBLE RANI SAMPAT | 9 |
| 20 | 2020014613 | 410087 | KAMBLE RUSHIKESH RAJENDRA | 9 |
| 21 | 2020014616 | 410090 | KAMBLE SANIKA KUNDAN | 9 |
| 22 | 2020014619 | 410091 | KHANDEKAR PRATHMESH SHIVAJI | 9 |
| 23 | 2020014629 | 410099 | KOLAP ROHIT DIPAK | AB |
| 24 | 2020014637 | 410107 | KUDCHIKAR JUVERIYA ASIF | 9 |
| 25 | 2020014644 | 410112 | LAD KISHORI KRUSHNAT | 9 |
| 26 | 2020014661 | 410123 | LOKHANDE SHIVANI PRAKASH | 9 |
| 27 | 2020014666 | 410128 | MALWADKAR KRISHNA RAJU | AB |
| 28 | 2020014674 | 410136 | MANE SHITAL RAJENDRA | 9 |
| 29 | 2020014677 | 410139 | MOHITE PRERANA PRAVIN | 9 |
| 30 | 2020014680 | 410142 | MUJAWAR SADALI GAFRUDDIN | 9 |
| 31 | 2020014690 | 410149 | NARSINGE SANIKA BHARAT | 9 |
| 32 | 2020014703 | 410160 | PATIL GIRISH SAMPAT | 9 |
| 33 | 2020014707 | 410164 | PATIL KOMAL NAMDEV | 10 |
| 34 | 2020014708 | 410165 | PATIL NAYAN JAYSING | 10 |
| 35 | 2020014713 | 410169 | PATIL RANVEER RAVINDRA | 9 |
| 36 | 2020014768 | 410174 | PATIL VAIBHAVI CHANDRAKANT | 10 |
| 37 | 2020014718 | 410176 | PATIL VAISHNAVI PRABHAKAR | 9 |
| 38 | 2020014801 | 410179 | PATVEGAR SHOAIB SHAHANAVAJ | 9 |
| 39 | 2020014723 | 410180 | PINGALE ANIKET GURUDAS | 9 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMO

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Student Marks Entry

Session: JUNE-JU
Stream: B.A.

Course: B.A. - SY

Session:JUNE-JULY 2022

| Sr.No. | PRN No | Seat No | Student Name | Marks |
|---|---|---|---|---|
| 40 | 2020014725 | 410182 | PORE SHUBHANGI SAMBHAJI | 9 |
| 41 | 2020014739 | 410191 | RANE TEJAS PANDIT | 9 |
| 42 | 2020014745 | 410197 | REDEKAR SANDESH SANTARAM | 9 |
| 43 | 2020014746 | 410198 | REPE POOJA YALGONDA | 10 |
| 44 | 2020014750 | 410202 | SANADE SRUSHTI SUDARSHAN | 9 |
| 45 | 2020014759 | 410209 | SHAIKH SAHIL RIYAJ | 9 |
| 46 | 2020014761 | 410211 | SHENDAGE RUSHIKESH NAMDEV | AB |
| 47 | 2020014804 | 410212 | SHINDE MAYURESH KRUSHNAT | 9 |
| 48 | 2020014769 | 410218 | SURYAVANSHI SHIVANI MARUTI | 10 |
| 49 | 2020014772 | 410220 | SWAMI APURVA GAJANAN | 10 |
| 50 | 2020014773 | 410221 | THAKARE DHANASHRI DATTATRAY | 9 |
| 51 | 2020014798 | 410224 | YADAV VAIBHAV KRUSHNAT | 9 |

Internal Examiner

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

10/10

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Name : कोमल नामदेव पाटील
Class बी.ए. भाग II Div: Roll No. 5114
Suppliment No. पेपर क्र. 5 Subject समाजशास्त्र
Test / Tutorial No. सेमीस्टर IV

* होम असाईनमेंट *

प्रश्न : ग्रामीण समुदायाचे बदलते स्वरुप स्पष्ट करा.

→ जगामध्ये अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इ. सारख्या युरोपियन देशांच्यामध्ये औद्योगिकरण, नागरीकरण आणि आधुनिकीकरण प्रक्रियेला वेग अधिक असल्यामुळे त्या ठिकाणची 60 ते 70 % लोकसंख्या शहरांच्यामध्ये आढळते. याउलट भारतामध्ये आजही खेड्यांच्यामध्ये राहणारी लोकसंख्या 60 ते 65 % इतकी आहे. ग्रामीण भारतामध्ये गेल्या तीन - चार दशकामध्ये कमालीचे बदल घडून येत आहेत. आधुनिक भारताची उभारणी करणाऱ्या गांधी, नेहरु, पटेल, जयप्रकाश नारायण इ. परिवर्तनाची दिशा निश्चित करताना खेड्यांच्या विकासाला प्राधान्य दिले होते. महात्मा गांधी यांनी ग्रामीण परिवर्तनामध्ये खेड्यातील पुरातनवादी विचार, जातीवाद, अस्पृश्यता, मद्यपान निरक्षरता, अंधश्रद्धा सारख्या समस्यांना दूर करण्याचा प्रयत्न केला होता.

आज ग्रामीण भागाचे चित्र पाहिले तर, त्या ठिकाणी ग्रामीण महिला, भूमीहीन शेतमजूर, अनुसूचीत जाती आणि जमाती, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, शेती, दळण - वळण आणि प्रसार माध्यम इ. सर्वच क्षेत्रात कमालीचे परिवर्तन दिसून येते. परंतू अशा स्वरुपाचा बदल अचानकपणे घडून आलेला नसतो, तर त्यासाठी शासन विकास कार्यक्रमासाठी आर्थिक खर्च करत असते.

भारतातील ग्रामीण परिवर्तनाचा अभ्यास वेगवेगळ्या दृष्टिकोनातून करता येतो. परंतू आज ग्रामीण समाजातील परिवर्तनाची दिशा कोणत्या दिशेने चालू आहे. कोणत्या प्रकारचे बदल आज ग्रामीण भागात घडून येत आहेत? केवळ आर्थिक क्षेत्रातच बदल घडून येत आहेत का? इ. प्रश्नांचा मागोवा घेत असताना ए. आर. देसाई यांनी ग्रामीण सामाजिक परिवर्तना-संबंधीच्या अभ्यासामधील प्रमुख बदल विचारात घेतले आहेत.

VIVEKANAND COLLEGE (Autonomous) ESTD JUNE 1964

1) शेती उत्पादनाबाबतचा बदलता दृष्टिकोन :

सुरुवातीच्या कालखंडात ग्रामीण शेती अर्थ-व्यवस्था ही केवळ कुटुंब चरितार्थासाठी म्हणून उपयुक्त समजली जात होती, परंतू नागरीकरण आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे ती बाजारपेठांच्या उद्देशाने केली जाते. याचा अर्थ सुरुवातीच्या कालखंडात बाजारपेठांचा अभाव होता असे म्हणता येत नाही. परंतू त्या काळात शेती उत्पादनातून स्थानिक खेड्यांच्या गरजा आणि जवळपास असणाऱ्या इतर काही खेड्यांच्या गरजा पूर्ण होतील इतकेच उत्पादन केले जात होते.

ज्या ग्रामीण समूहामध्ये बाजारपेठांचा अभाव असतो अशा समुदायावरती बाजारपेठांच्या वाढत्या व्याप्तीमुळे काही सामाजिक परिणाम दिसून येवू लागले.

अ) ग्रामीण व्यक्तींच्या राहणीमानावर झालेला परिणाम :

ज्या भांडवलशाही समाजव्यवस्थेमध्ये बाजरपेठांचा प्रभाव होता. अशा युरोपियन समाजातील राहणीमान 'उपभोगाच्या वस्तूवर' आधारित होते. म्हणून त्या समाजांना 'उपभोक्तावादी समाज' असे म्हटले जाते. उदा. फ्रीज, टेलीव्हिजन, कार इ. सारख्या वस्तूंचा अतिरेक वापर त्या ठिकाणी दिसतो. नेमकी तीच राहणीमानाची पद्धत आज भारतीय खेड्यांच्यामध्ये बाजारपेठांचा परिणाम म्हणून दिसून येवू लागली.

ब) बाजारपेठांचा वाढता प्रभाव आणि उपभोगाच्या वस्तूमध्ये होणारी वाढ :

भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये बाजारपेठांचा प्रभाव व्यापक असतो. त्यांना भौगोलिक मर्यादा नसतात. भारतामध्येसुद्धा औद्योगिकरणामुळे बाजारपेठांचा प्रभाव वाढत आहे. ग्रामीण बाजारपेठांच्या मध्ये उपभोगाच्या वस्तूचे प्रमाण वाढत आहे.

क) उपभोक्त्यांचा नवीन वर्ग ग्रामीण भागात उदयास आला :

आज ग्रामीण भागात चैनीच्या वस्तूंचा उपभोग घेणाऱ्या उपभोक्त्याचा वर्ग निर्माण झाला आहे. उदा. व्यापारी, जमिनदार, कार्यालयीन अधिकारी राजकीय कार्यकर्ते इ. सारख्या व्यक्ती नव-नविन वस्तूंचा उपभोग घेणारा वर्ग म्हणून ओळखला जातो. अशा वर्गाकडे असणाऱ्या चैनीच्या वस्तूमुळे आणि त्यांच्या राहणीमानामुळे ग्रामीण भागात सामान्य व्यक्तींच्यापेक्षा वेगळा दर्जा दिसतो.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

## २) तंत्रज्ञानामुळे घडून आलेले ग्रामीण परिवर्तन :

तांत्रिक प्रगतीमुळे आज जागतिक व्यवस्था बदललेली दिसते. तंत्रज्ञान म्हणजे केवळ, यांत्रिक घटकांशी संबंधित जे घटक येतात त्यांच्याशी नसून अर्थव्यवस्थेशी संबंधीत असणाऱ्या वित्तिय संस्था, बँका, सहकारी संस्था, कंपन्या, उद्योग-संस्था, कंपन्या, इ. यांचा देखील त्यामध्ये समावेश होतो.

भारतातील शेती व्यवस्थेचा विचार करता, शेतीसाठी पारंपारिक तंत्रज्ञानाचा वापर अधिक होतो. शेती अवजारांचा उपयोग करताना आधुनिक, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमीत - कमी केला जातो. परंतू त्यामुळे बाजारपेठांच्या दृष्टीने उत्पादन मिळत नव्हते.

### अ) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :

ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांनी ज्या वेळी सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सुरुवात केली त्यावेळी शेतकरी स्वयंपूर्ण होऊ लागले. संकरित बियाणांचा वापर, नांगरणीमधला बदल, ट्रॅक्टर, रासायनिक खते आणि कीटक-नाशकांचा वापर, मळणी इ. सारख्या शेती करण्याच्या पद्धतीमधल्या बदलामुळे महाराष्ट्र, पंजाब, गुजरात, हरियाणा इ. राज्यात शेती व्यवसायाला नवीन स्वरूप प्राप्त झाले.

### ब) शेती उत्पादनामध्ये वाढ :

आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेती उत्पादनामध्ये वाढ होऊ लागली. लहान - मध्यम - मोठे धरण प्रकल्प, कूपनलिकांचा वापर, पाझर तला इ. मुळे जलसिंचन पद्धतीमुळे सुधारणा होऊ लागल्या. रासायनिक खतांच्या वापरामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ झाली तर दुसऱ्या बाजूला कीटकनाशक औषधामुळे शेतीमधल्या पिकांचे वेग-वेगळ्या रोगांपासून संरक्षण होऊ लागले त्यामुळे भारतात 'हरितक्रांती' घडून आली आणि अन्न धान्याच्या क्षेत्रात भारत स्वयंपूर्ण बनू लागला.

### क) दुग्ध - व्यवसाय आणि पशुपालन :

भारत हा शेतीप्रधान देश असला तरी, त्याला संलग्न म्हणून असणारा पशुपालक आणि दुग्ध - व्यवसायामुळे ग्रामीण भागात प्रगती झालेली दिसते. दुग्ध व्यवसायातील प्रगतीमुळे भारतात जो बदल झाला त्याला 'श्वेतक्रांती' म्हटले जाते. डेअरी उत्पादनाला आज जागतिक बाजारपेठ प्राप्त झाली आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

3] जमिनदारी, जाहागीरदारीचा ऱ्हास :

1950 पासून भारतातील ग्रामीण समाजामध्ये प्रचलित असणारी जमिनदारी, जाहागीरदारी, जोतेदारी पद्धतीचा ऱ्हास होत गेल्याने त्या ठिकाणी संरचनात्मक स्वरूपाचे परिवर्तन घडून आले. शेतमजूरांचे जमीनदारांकडून जी पिळवणूक होत होती त्याचे प्रमाणदेखील कमी झाले. ग्रामीण समाजातील जमिनदारी अथवा जाहागीरदारी नष्ट झाल्याचा अनुकूल परिणाम हा केवळ कुळांच्या अथवा जमीनदारांच्या पुरता नव्हता तर त्यांचे एकूणच संपूर्ण ग्रामीण समाजावर परिणाम झालेले दिसतात.

4] ग्रामीण समाजातील उदयास आलेल्या विविध संस्थांच्या माध्यमातून घडून येणारे परिवर्तन :

ग्रामीण समुदायामध्ये नव्याने उदयास येत असलेल्या विविध स्वरूपाच्या संस्था आणि त्यांच्या कार्यामुळे परिवर्तन घडून येवू लागले. तसेच, नवीन संस्थांची निर्मिती होण्यापूर्वी अस्तित्वात असणाऱ्या जाती आणि वर्ग सारख्या संस्थाच्या कार्यपद्धती मधल्या बदलामुळे देखील परिवर्तन घडून आले.

अ) जातीव्यवस्थेमधील बदल :

पूर्वी ग्रामीण भागामध्ये व्यक्तीला जातीवर आधारित व्यवसाय करणारे बंधन होते. परंतू शहरीकरणामुळे व्यावसायिक गतीशीलता आली. त्यामुळे ग्रामीण व्यक्ती तिच्या इच्छेनुसार कोणताही व्यवसाय करु शकतो.

ब) वर्ग व्यवस्थेमधील बदल :

परिवर्तनाचा परिणाम म्हणून जाती आणि वर्ग यांच्यातील सुरूवात झाली. 'दोषी आणि जैन' या अभ्यासकांच्या मते, ग्रामीण भागात सुरु केलेल्या विकास कार्यक्रमाचा परिणाम म्हणून उच्च जातीमधला एक वर्ग उदयास आला.

क) ग्रामीण समाजातील विविध संस्था :

ग्रामीण समाजामध्ये आज ज्या विविध प्रकारच्या संस्था, धर्मदायी संस्था, शासकीय संस्था, जाती संस्था, शेतमजूरांच्या संस्था, शैक्षणिक संस्था इ.चा समावेश होतो.

अशाप्रकारे ग्रामीण समाजातील परिवर्तनाचे स्वरुप विचारात घेता, औदयोगिकरण, नागरीकरण, आधुनिकीकरण, शिक्षण इ.मुळे ग्रामीण भागातील परिवर्तनाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढले आणि त्यामुळे भारतातील ग्रामीण जीवन संपूर्णता बदलून गेले आहे.

10/10

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964